सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १२७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २९ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## नसरापूर अत्याचार आणि हत्या प्रकरण

# आरोपी भीमराव कांबळेला फाशीची शिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ मुंबई–** पुण्यातील नसरापूर बलात्कार आणि हत्या प्रकरणात अखेर पुण्यातील विशेष न्यायालयाने निकाल दिला आहे. या प्रकरणातील आरोपी भिमराव कांबळेला न्यायालयाने आधीच दोषी ठरवलं होतं. आज या प्रकरणाच्या अंतिम सुनावणीदरम्यान न्यायालयाने आरोपी भिमराव कांबळेला फाशीची शिक्षा सुनावली. न्यायालयाच्या या निर्णयाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. या सुनावणीदरम्यान नसरापूर प्रकरणातील पीडित मुलीचे आई –वडील आजी इतर नातेवाईक कोर्टात हजर होते. वडिलांनी कोर्टाकडे आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी केली होती.या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने गुरूवारी भिमराव कांबळेला भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्यातील विविध कलमांअंतर्गत दोषी ठरवलं होतं. त्यानंतर न्यायालयात आरोपीला काय शिक्षा द्यायची या मुद्द्यावर सरकार पक्ष, बचाव पक्ष आणि मूळ फिर्यादी यांच्या वतीने



स्वतंत्रपणे युक्तिवाद करण्यात आला. विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी हा गुन्हा दुर्मिळातील दुर्मिळ असल्याचे सांगत आरोपीला फाशी देण्यात यावी अशी मागणी केली होती. आरोपीमुध्ये सुधारण्याची शक्यता नसल्याचे देखील त्यांनी सांगितले होते.दरम्यान, भोर तालुक्यातील नसरापूर येथे १ मे रोजी ही घटना घडली होती. ३ वर्षांच्या चिमुकलीवर भिमराव कांबळे या नराधमाने लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केली होती. चिमुकलीला वासरू दाखवतो सांगत आरोपी तिला गोठ्यात घेऊन गेला आणि त्याठिकाणी त्याने तिच्यासोबत भयंकर कृत्य केले. चिमुकली आजोळी आजीकडे गेली असता ही घटना घडली होती. आरोपीला पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे अटक केली होती. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी पुण्यात रास्तारोको करत पुणे–बंगळुरू महामार्ग रोखून धरला होता. संपूर्ण राज्यभरात या घटनेचे पडसाद उमटले होते.–


## RSS कार्यक्रमावरील वादावर विश्वास नांगरे पाटील यांचे स्पष्टीकरण !

# ‘माझी पूर्ण कटिबद्धता संविधानाशी आहे’

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९नागपूर** :नवी मुंबईतील हिंदू संमेलनात राष्ट्रीय स्वयंसेवक संघासंदर्भात केलेल्या स्तुतीपर भाषणाच्या व्हिडिओमुळे राजकीय वातावरण तापले असताना नागपुरचे नवनियुक्त पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. संघाच्या कार्यक्रमात जाऊन मी कुठल्याही सेवाशर्तींचे उल्लंघन किंवा कायद्याचा भंग केलेला नाही. माझी संविधानासोबत पूर्ण कटिबद्धता आहे असे त्यांनी सांगितले. नागपुरात पदभार ग्रहण केल्यानंतर ते पत्रपरिषदेदरम्यान बोलत होते.

मला सगळ्यांचा प्रचंड आदर आहे. मी पोलिस सेवेचा अधिकारी असून माझी पूर्ण कटिबद्धता संविधानाशी आणि त्याच्या मूल्यांशी आहे. नागपुरात



दीक्षाभूमी असून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार माझे मार्गदर्शक आहे. पोलीस अधिकारी असल्याने विविध संघटना, संस्था यांच्या कार्यक्रमामध्ये जाणे आणि तिथे उपस्थित लोकांना भेटणे स्वाभाविक आहे. ज्या कार्यक्रमाबाबत आक्षेप घेतला जात आहे तो १९ एप्रिलचा कार्यक्रम होता. जे नागरिक सकल हिंदू समाजातर्फे निमंत्रण घेऊन आले होते, त्यात अनेक प्रतिष्ठित नागरिकांचा समावेश होता.

मी ३० वर्षांपासून पोलिस सेवेत आहे. रमजान ईदला जातो, जैन, शीख धर्माच्या कार्यक्रमात जातो, त्याच अनुषंगाने मी तिथेदेखील गेलो होतो. तेथे जीएसटी, अध्यात्म इत्यादी विषयांवर मार्गदर्शन झाले होते. त्यात मी मानवी कल्याणासाठीच्या सामूहिक प्रार्थना बोलून दाखविल्या. त्या भाषणामध्ये मी ज्ञानेश्वरीतील प्रार्थनादेखील म्हटली होती. तसेच अंमली पदार्थांमुळे तरुणाईचे होणारे नुकसान, पोलीस दलातील संधी याबाबतदेखील बोललो होतो. तो कार्यक्रम वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला दीडशे वर्ष व संघाला शंभर वर्ष झाल्याबाबत होता. त्यामुळे मी कुठल्याही नियमाचे उल्लंघन केले आहे असे वाटत नाही, असे विश्वास नांगरे पाटील म्हणाले.

## भाजप शहर संघटनेत मोठा बदल

# नितीन गुडधे पाटील नवे शहराध्यक्ष

### विद्यमान शहराध्यक्ष नितीन धांडे यांना हटविले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ अमरावती** शहर भाजपच्या संघटनात्मक पातळीवर मोठा बदल करण्यात आला आहे. विद्यमान शहराध्यक्ष नितीन धांडे यांना पदावरून हटविण्यात आले असून त्यांच्या जागी नितीन गुडधे पाटील यांची शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नियुक्तीचे अधिकृत पत्र जारी केले. प्रवीण पोटे यांच्या सक्रिय राजकीय आगमनानंतर शहरातील भाजपच्या



राजकारणात या बदलामुळे खळबळ उडाली आहे. नव्या नियुक्तीमुळे संघटन बळकटीसह आगामी स्थानिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची रणनीती अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. ग्रामिण जिल्हाध्यक्ष पदी आमदार प्रतापदादा अडसड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## फडणवीसांना PM पदासाठी पाठिंबा देणार का?

# उद्धव ठाकरे म्हणाले– गद्दार सोडून

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२९ शिर्डी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख यांनी नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पंख छाटण्याचे काम सुरू असल्याचे म्हटले होते. आज शिर्डीत पत्रकारांनी त्यांना फडणवीस पंतप्रधान होणार असतील तर त्यांना पाठिंबा देणार का? असे विचारले असता ते म्हणाले, आधी फडणवीसांनी जाहीर करावे की, ते पंतप्रधान पदाची तयारी करत आहेत. पण त्यांनी आपली भूमिका मांडल्यास ते पक्षात राहतील का? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला. सोबतच गद्दार सोडून मराठी माणूस पंतप्रधान व्हावा. देवेंद्र फडणवीस यांना संघाचा पाठिंबा आहे. मात्र, त्यांच्या करिअरची आपल्याला



चिंता वाटते, अशी प्रतिक्रियाही त्यांनी यावेळी दिली.

शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या बंडानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे सध्या शिर्डीच्या दौऱ्यावर आहेत. पक्षातील सहा खासदारांच्या फुटीनंतर निर्माण झालेली परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी उद्धव ठाकरे मागील तीन दिवसांपासून बंडखोर खासदारांच्या मतदारसंघात आक्रमक दौरे करत आहेत. आज शिर्डीत शिवसैनिकांशी संवाद साधण्यापूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ’डिलिमीटेशन बिल’ (मतदारसंघ पुनर्रचना विधेयक) आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय कारकिर्दीवरून भाजपवर जोरदार शरसंधान केले.

पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर खोचक टिप्पणी करत भाजपच्या अंतर्गत राजकारणावर बोट ठेवले. ते म्हणाले, मला देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय भवितव्याची मनापासून काळजी वाटते. मी हे केवळ वरवर किंवा चेष्टा–मस्करी म्हणून बोलत नाहीये. महाराष्ट्रातील कोणत्याही नेत्याने देशपातळीवर नेतृत्व करण्याचे किंवा पंतप्रधान होण्याचे स्वप्न पाहिले, तर त्यात काहीही गैर नाही.

उद्धव ठाकरे म्हणाले, यापूर्वी भाजपमधून नितीन गडकरी यांचे नाव या शर्यतीत घेतले जात होते. गडकरींना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा (ठडड) मोठा पाठिंबा होता, मात्र त्यांना काही कारण नसताना बाजूला सारून बदनाम करण्यात आले. आता देवेंद्र फडणवीस हा एक चांगला आणि सक्षम चेहरा समोर आहे. फडणवीस यांनाही संघाचा पूर्ण पाठिंबा असल्याचे माझ्या कानावर आले आहे. म्हणूनच, संघाचा पाठिंबा असलेला हा मराठी माणूस उद्या पंतप्रधानपदाच्या शर्यतीत येऊच नये, म्हणून हे सगळे अंतर्गत कारस्थान चालले आहे की काय? अशी शंका घ्यायला नक्कीच जागा आहे.

# ४ जुलैची अमरावती–पुणे एक्सप्रेस हडपसरपर्यंतच धावणार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती**

मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील पुणे यार्ड येथे ट्रॅक बदलण्याच्या महत्त्वाच्या कामामुळे ४ जुलै २०२६ रोजी धावणाऱ्या अमरावती पुणे एक्सप्रेसच्या मार्गात तात्पुरता बदल करण्यात आला आहे. त्यामुळे गाडी क्रमांक ११४०६ अमरावती–पुणे एक्सप्रेस ही नियोजित पुणे स्थानकाऐवजी हडपसर स्थानकापर्यंतच धावणार असून, हडपसर ते पुणे हा प्रवास रद्द करण्यात आला आहे.

### प्रवाशांनी नियोजन करून प्रवास करावा

रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना या बदलाची नोंद घेऊन आपल्या प्रवासाचे नियोजन करण्याचे आवाहन केले आहे. पुणे स्थानकापर्यंत जाणाऱ्या प्रवाशांनी हडपसरहून पुढील प्रवासासाठी पर्यायी वाहतुकीचा वापर करावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. रेल्वेच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आणि सुरक्षितता वाढविण्यासाठी ही कामे आवश्यक असल्याने प्रवाशांनी सहकार्य करण्याचे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील पुणे यार्ड येथे विद्यमान ट्रॅक संरचनेतील डीडीएस पॉईंट क्रमांक २०७/२०८ बदलण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. हे काम सुरक्षितपणे पूर्ण करण्यासाठी आवश्यक वाहतूक आणि वीज ब्लॉक घेण्यात येणार असल्याने काही रेल्वे गाड्यांच्या संचालनात तात्पुरते बदल करण्यात आले आहेत.या बदलानुसार, ४ जुलै २०२६ रोजी अमरावतीहून सुटणारी गाडी क्रमांक ११४०६ अमरावती–पुणे एक्सप्रेस ही केवळ अमरावती ते हडपसर या मार्गावरच धावेल. हडपसरनंतर पुणे स्थानकापर्यंत गाडीचे संचालन रद्द राहणार आहे.

# वारकऱ्यांच्या ‘चरण सेवेला’ प्रारंभ

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२९ मुंबई** आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे पायी मार्गस्थ होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे ’चरण सेवा’ उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध आरोग्य संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरणसेवेला प्रारंभ झाला आहे. त्यात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि आरोग्य जनजागृतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.वारकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या ’चरण सेवा’ उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावरील सुमारे ४०० विश्रांती व मुक्काम स्थळी वारकऱ्यांसाठी चरण सेवा, वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय व फिजिओथेरपीचे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत असतील.

**३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाद्वारे मालिश**– आषाढी वारीदरम्यान दररोज अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांवर मोठा ताण येतो. पायांना सूज, वेदना, फोड, स्नायूंचा ताण व थकवा यांसारख्या समस्यांवर तात्काळ उपाययोजना उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशिक्षित वैद्यकीय पथके व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत.

या उपक्रमांतर्गत औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी सुमारे ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था करण्यात आली असून, गरजेनुसार पालखी मार्गावर



रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

**८ आरोग्य रथाद्वारे जनजागृती**– चरण सेवेसोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैलीचा संदेश तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तसेच, वारकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी पालखी मार्गावरील निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख तसेच पालखी मार्गावरील नागरिकांना ’चरणसेवा’ आणि आरोग्य जनजागृती उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि सेवाभावी दृष्टिकोनातून ’चरण सेवा’ उपक्रम साकार झाला आहे. वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देणारा हा एक अभिनव उपक्रम असून, आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देतानाच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न या माध्यमातून होत आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष विविध संस्थांच्या समन्वयातून यंदाही ही चरण सेवा अधिक व्यापक स्वरूपात वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास सज्ज असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.–

# अमरावतीतील अवैध सावकारांवर फौजदारी कारवाई होणार?

### विधानसभेत आ. सुलभाताई खोडकेंचा सरकारला जाब

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती,**अमरावती जिल्ह्यात वाढत असलेल्या अवैध सावकारीच्या प्रश्नावर आज विधानसभेत आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी सरकारला धारेवर धरत कठोर कारवाईची मागणी केली. शेतकऱ्यांना जादा व्याजदराने कर्ज देऊन त्यांची बेकायदेशीर वसुली केली जात असल्याने अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडत असून काहींना आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागत असल्याचा गंभीर मुद्दा त्यांनी सभागृहात मांडला.यावर उत्तर देताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी अमरावती जिल्ह्यात अवैध सावकारीच्या ३८४ तक्रारी प्राप्त झाल्याची माहिती दिली. त्यापैकी २६६ तक्रारींमध्ये तथ्य आढळले नाही, तर ३४ प्रकरणांमध्ये तथ्य आढळून आल्याने संबंधित ४८ आरोपींवर फौजदारी कारवाई करण्यात येणार





असल्याची घोषणा त्यांनी केली.मंत्री पाटील यांनी सांगितले की, जिल्ह्यात अवैध सावकारीला आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय त्रिसदस्यीय प्रशासकीय समिती स्थापन केली जाणार आहे. तसेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समन्वय समितीमार्फत पीककर्ज मंजुरी व वितरण प्रक्रियेवर नियमित देखरेख ठेवण्यात येईल.आ. खोडके यांनी शेतकऱ्यांना बँका आणि कायदेशीर वित्तीय संस्थांकडून सुलभ पद्धतीने कर्ज उपलब्ध व्हावे, कर्ज प्रक्रियेतील अडथळे दूर करावेत तसेच विशेष सवलत योजना राबवाव्यात, अशी मागणी केली. त्याचबरोबर पंतप्रधान किसान सन्मान योजनेअंतर्गत किसान क्रेडिट कार्ड सुविधेचा लाभ किती शेतकऱ्यांना मिळाला, याबाबतही त्यांनी सरकारकडे खुलासा मागितला.यासंदर्भात सहकार मंत्र्यांनी परवानाधारक सावकारांना व्याजदराचे फलक लावणे बंधनकारक करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच बेकायदेशीरपणे ताब्यात घेतलेल्या शेतजमिनी व मालमत्ता मूळ शेतकऱ्यांना परत मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती देत, शेतकऱ्यांना कायदेशीर कर्जव्यवस्थेकडे वळवण्यासाठी जनजागृतीवरही भर दिला जाणार असल्याचे स्पष्ट केले.

# विधान भवनाला पुन्हा धमकीचा ई-मेल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९मुंबई** – विधान भवनाला पुन्हा धमकीचा ई–मेल मिळाला आहे. विधान भवनाला बॉम्ब स्फोटानं उडवून देण्याची धमकी मेलमधून देण्यात आली आहे. शुक्रवारी सकाळी ८ वाजून ११ मिनिटांनी धमकीची ई–मेल असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. दरम्यान सुट्टीचा दिवस असल्याने पोलीस यंत्रणेकडून जलदगतीनं तपासणी केली जातेय. संपूर्ण विधिमंडळाची तपासणी केल्यानंतर हॉक्स ई–मेल असल्याचं स्पष्ट झालंय. धमकीचा ई–मेल शुक्रवारी दुपारी १ वाजून ११ मिनिटांनी बॉम्ब स्फोट घडवून आणण्याचा उल्लेख होता. विधान भवनासोबतच ई–मेलमध्ये मेट्रो स्टेशन, मंत्रालय,



स्टॉक एक्सचेंजचा देखील उल्लेख होता. आज सकाळी कडक एसओपींसोबतच विधिमंडळ परिसरातील कसून तपासणी करण्यात आली. याआधी विधीमंडळाचे सत्र चालू असताना धमकीचा ई–मेल आला होता. आता पुन्हा सत्र चालू असतानाच धमकीचा मेल आलाय.

## संपादकीय ......

# मास्तरांचाच पेपर फुटल्याने नाचक्की

आजवर विद्यार्थ्यांचा पेपर फुटत होता, पण आता जे विद्यार्थी घडवतात, त्या मास्तरांची पात्रता सिद्ध करणार्या परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे मोठा गहजब उडाला आहे. म्हणजे जे मास्तर विद्यार्थी घडवतात, त्यांना शिक्षणाचे आणि नैतिकतेचे धडे देतात. देशाचे नागरिक घडवतात, त्या मास्तरांचा पेपर फुटला आहे. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचा (टीईटी) पेपर आदल्याच दिवशी म्हणजे २७ जून रोजी ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे फुटल्याचे उघडकीस आले. या पेपरफुटीमुळे ६ लाखांपेक्षा जास्त परीक्षार्थींचे नुकसान झाले असून परीक्षा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आली आहे. राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षे (नीट)नंतर टीईटी पेपरफुटी झाली. त्यामुळे याला चाप लावण्यासाठी अत्याधुनिक विज्ञान, माहिती आणि तंत्रज्ञानाच्या काळात परीक्षापद्धतीत बदल होण्याची गरज निर्माण झाली आहे.

दहावी, बारावी किंवा इतर महत्वाच्या परीक्षांचे पेपर याआधीही फुटत होते. परंतु व्हॉट्सअॅप किंवा प्रसार समाज माध्यमे त्याकाळी एवढी सक्षम नव्हती. आज फुटलेला पेपर काही सेकंदात हजारो उमेदवारांपर्यंत पोहचवला जातो. त्यामुळे परीक्षार्थींचे होणारे नुकसानही त्याच वेगाने वाढते. टीईटी आणि नीटसारख्या मोठ्या परीक्षांचे पेपर फुटतात, तेव्हा त्याचे परिणाम फक्त एका दिवसापुरते मर्यादित नसतात. ही दुर्घटना एका बाजूला पात्र उमेदवारांचे भवितव्य अंधारात ढकलते, तर दुसर्या बाजूला त्यांच्या कुटुंबाला मानसिक आणि आर्थिक गर्तेत लोटले जाते. यातून होणार्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांनी हा विषय कमालीचा गंभीर होतो, यातून विद्यार्थ्यांच्या मानसिक तणावाचा अंदाज येऊ शकतो. स्पर्धा परीक्षांची तयारी हा आता एक मोठा आर्थिक व्यवहार झाला आहे. उमेदवारांची वाढती संख्या आणि नियुक्ती तसेच शिक्षण संधीच्या घटणार्या जागा असे हे व्यस्त प्रमाण आहे. पेपरफुटीतून आर्थिक नुकसान होतेच, मात्र विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला तडा जातो.

व्यवस्थेवरील विश्वास उडाल्याने प्रामाणिकपणा, मेहनत आणि अभ्यास करूनही यशाची खात्री नसल्याने विद्यार्थी हताश होतात. सरकारी, खासगी शिक्षणसंस्थापेक्षा खासगी क्लासेसकडून होणार्या शिक्षणाच्या व्यावसायिकरणाला पाठबळ मिळते. राज्यातील शिक्षण संस्थांची स्थिती पाहता बेकायदा 'इंटीग्रेशन'ची वाढती व्यवस्था पेपरफुटी आणि शिक्षणाच्या बाजारीकरणाला खतपाणी घालणारी असल्याचे आजपर्यंतच्या अनुभवातून स्पष्ट होते. यातून पालकांची क्षमता नसताना प्रसंगी कर्ज काढून लाखो रुपयांचे कोचिंग क्लासेस पाल्यांसाठी लावले जातात. त्यासाठी शेती, मालमत्ता, दागिनेही गहाण ठेवणे, विकून टाकण्याचे प्रकार होतात. शिक्षण व्यवस्थेच्या बाजारीकरणातून गरीब विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचे अतोनात शोषण होत असते.

पेपरफुटीनंतर वर्षभराची मेहनत आणि भविष्यातील स्वप्नांना एकत्रच सुरूंग लागतो. परीक्षा, प्रवास, पाठ्यपुस्तकांचा खर्च वाया जातो, परीक्षा रद्द झाल्याने पुन्हा तसाच खर्च नव्याने परीक्षेसाठी करावा लागणार असल्याने खर्चाचा बोजा दुपटीने वाढतो. जे विद्यार्थी दोन-दोन वर्षे प्रामाणिकपणे दहा, चौदा तास अभ्यास करतात, त्यांना बसलेल्या मानसिक धक्क्याचा अंदाज लावता येत नाही. विद्यार्थ्यांचे मनोधैर्य खचून गेल्याने त्यातून होणारे नुकसान त्यांच्या संपूर्ण भविष्यावर परिणाम करते. पुढील परीक्षा तरी पारदर्शकपणे होईल का? त्यात गैरप्रकार झाले तरी ते लपवले जातील का, या विचारांमुळे विद्यार्थ्यांचे नैराश्य कमालीचे वाढते. पेपर फुटल्यानंतर त्या वर्षांची परीक्षा रद्द झाल्यावर गेलेल्या वेळेचे आणि वाढलेल्या वयाचे नुकसान भरून निघणारे नसते. वय निघून गेल्याने अपात्रतेमुळे शैक्षणिक आणि नोकरीच्या संधींना मुकावे लागते. प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेपेक्षा लबाडीला संधी मिळत असल्याचे समोर आल्यानंतर मूल्यांवरील उडालेला विश्वास जास्त हानीकारक असतो.

फुटलेल्या पेपरची खरेदी, विक्रीतून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासापेक्षा गुन्हेगारी मानसिकता वाढीस लागते. वारंवार होणार्या पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचा देशाच्या, राज्याच्या शिक्षण आणि परीक्षा पद्धतीवरील विश्वास पूर्णपणे उडून जात आहे. अभ्यास करून काही फायदा नाही, शेवटी वशीला आणि पैसाच चालतो, अशी नकारात्मक भावना तरुणांमध्ये निर्माण होते, जी समाजासाठी अत्यंत घातक आहे. भिवंडीतील टीईटी पेपरफुटी प्रकरण हा नियोजनबद्ध आंतरराज्य संघटित गुन्हेगारीचा प्रकार असल्याचे समोर आले आहे. या कारस्थानाच्या पुढील तपासात आणखी गोष्टी उघड होतीलच. मात्र आपल्याकडील पारंपरिक परीक्षा पद्धत ही आधुनिक तंत्रसाधनांच्या आव्हानापुढे कमालीची कमकुवत असल्याचे अशा घटनांतून वारंवार स्पष्ट होत आहे. 'नीट' परीक्षेच्या गोंधळानंतर आलेल्या अनुभवातून 'टीईटी' साठी उपाययोजना केली गेली असतानाही पेपर फुटला. प्रश्नपत्रिकेची वाहतूक, साठवणूक आणि वितरण पद्धतीमधील तांत्रिक कमकुवतपणामुळे आरोपींना पेपर आधीच मिळवण्यात यश आल्याचे समोर आले आहे.

# आदर्श शाळांच्या निधीचा पूर्ण उपयोग करावा- राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती**



जिल्ह्यातील आदर्श शाळांसाठी शासनस्तरावर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. इमारत बांधकाम कमी किंमतीत झाले असले तरी शाळांमधील इतर सुविधांसाठी हा निधी उपयोगात आणता येणार आहे. यासाठी तातडीने शासनाकडे प्रस्ताव पाठवून मान्यता घ्यावी आणि उर्वरित निधी शाळेतील सुविधांसाठी उपयोगात आणावा, अशा सूचना शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिल्या.डॉ. भोयर यांनी आज माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या कार्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी विभागातील पीएमश्री, सीएमश्री आणि आदर्श शाळांचा आढावा घेतला. बैठकीला उपसंचालक नीलिमा टाके, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, सहाय्यक शिक्षण संचालक अमोल पवार आदी उपस्थित होते. डॉ. भोयर यांनी विभागातील काही मोजक्याच आदर्श शाळांचे बांधकाम होऊ शकले नाही. त्यामुळे ज्या शाळांचे काम प्रगतीपथावर आहे, अशा शाळांचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्यात यावे. शाळा बांधकामांमध्ये कमी किंमतीच्या निविदा प्राप्त झाल्यामुळे बांधकामावरील खर्चात बचत झाली आहे. हा निधी शाळेच्या विकासासाठी उपयोगात आणणे शक्य आहे. उर्वरित निधीबाबत प्रस्ताव तयार करून इतर उपयुक्त सुविधा निर्माण कराव्यात. या ठिकाणी अभ्यासिका, संगणक सुविधा यासारख्या विद्यार्थ्यांसाठी उपयोगात येतील अशा सुविधा उभारण्यात याव्यात.शासकीय शाळांचा स्वच्छतेचा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे आदर्श शाळेचे बांधकाम करताना या शाळेचा स्वच्छतेचीही काळजी राखली जाईल, यासाठी प्रयत्न करण्यात यावे. आदर्श शाळा या खऱ्या अर्थाने आदर्श व्हाव्यात यासाठी आवश्यकता भासल्यास जिल्हा नियोजनच्या निधीतून मागणी करण्यात यावी. तसेच जिल्ह्यातील शाळांमधील स्वच्छतागृहांचा आढावा घेऊन या ठिकाणच्या सुविधा निर्माण करण्यात याव्यात, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीनंतर डॉ. भोयर यांनी मालटेकडी रोडवरील नियोजित डॉ. पंजाबराव देशमुख शैक्षणिक संकुलाच्या जागेची पाहणी केली. यावेळी आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, महापौर श्रीचंद तेजवानी आदी उपस्थित होते. संकुलाची इमारत भव्यदिव्य असावी, तसेच या ठिकाणी कॉन्फरन्स रूम करण्यात यावी. यासोबतच विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकाही निर्माण करण्यात यावी. सध्यास्थितीत शासकीय कर्मचाऱ्यांचे निवासस्थान बांधकामाबाबत पुनर्विचार करण्यात यावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. या संकुलाची घोषणा अर्थसंकल्पात झाल्यामुळे आवश्यक प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात याव्यात. ज्यामुळे डिसेंबर महिन्यात होणाऱ्या अधिवेशनात निधीची तरतूद करण्याविषयी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

# राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेला अमरावतीत उत्स्फूर्त प्रतिसाद

## ० ते ५ वर्षांतील प्रत्येक बालकापर्यंत पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पोहोचविण्यासाठी मनपा प्रशासनाचे विशेष नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती,**

भारताचा पोलिओमुक्त दर्जा कायम राखण्यासाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय लसीकरण दिन अंतर्गत रविवारी (दि. २८ जून) अमरावती महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम मोठ्या उत्साहात आणि नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आली. शहरातील सर्व शहरी आरोग्य केंद्रे, पोलिओ लसीकरण बूथ, बसस्थानके, रेल्वे स्थानक, सार्वजनिक ठिकाणे तसेच विशेष भ्रमणशील पथकांच्या माध्यमातून ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकापर्यंत पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवून ही मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत महापौर श्रीचंद तेजवानी, आमदार सौ. सुलभाताई खोडके, माजी पालकमंत्री ड. यशोमतीताई ठाकुर, महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, गटनेता नाना आमले, सन्मा. नगरसेवक व नगरसेविका, उपायुक्त योगेश पीठे यांनी विविध पोलिओ लसीकरण केंद्रांना भेटी देऊन मोहिमेची पाहणी केली. त्यांच्या हस्ते बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून मोहिमेला शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पालकांशी संवाद साधत प्रत्येक बालकाला पोलिओची लस देण्याचे महत्त्वही अधोरेखित केले.



राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत शहरातील सर्व शहरी आरोग्य केंद्रांमध्ये सकाळपासूनच लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली होती. याशिवाय ज्या बालकांपर्यंत बूथवर येणे शक्य झाले नाही, अशा बालकांसाठी विशेष पथकांमार्फत घरोघरी भेटी देऊन लसीकरण करण्यात आले. स्थलांतरित कुटुंबे, बांधकाम मजूर, वीटभट्ट्या, झोपडपट्ट्या, भटक्या-विमुक्त समाजाची वस्ती तसेच बसस्थानक आणि रेल्वे स्थानक परिसरातील बालकांना लसीकरणाचा लाभ मिळावा यासाठी विशेष नियोजन करण्यात आले होते.महानगरपालिका प्रशासनाने या मोहिमेसाठी आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, स्वयंसेवी संस्था आणि विविध विभागांतील कर्मचाऱ्यांचे सहकार्य घेतले. शहरातील सर्व लसीकरण केंद्रांवर आवश्यक औषधसाठा, मनुष्यबळ आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. मोहिमेचे प्रभावी नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सातत्याने देखरेख करण्यात आली.महापौर श्रीचंद तेजवानी यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, पोलिओसारख्या गंभीर आजारापासून आपल्या बालकांचे संरक्षण करण्यासाठी प्रत्येक पालकाने राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा. एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनीही सर्व पालकांना आपल्या परिसरातील पोलिओ बूथवर जाऊन किंवा आरोग्य पथकांच्या माध्यमातून ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजण्याचे आवाहन केले.

नागरिकांच्या सहकार्यामुळे ही मोहीम यशस्वी होणार असून, भारताचा पोलिओमुक्त दर्जा कायम राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.या मोहिमेत वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉक्टर विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर स्वाती कोवे, डॉक्टर संदीप पाटबागे, डॉक्टर फिरोज खान, १३ शहरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, आरोग्य सेवक, स्टाफ नर्स उपस्थित होते.

# भावी पिढ्यांसाठी हिरवाईचा वसा एकवटणारी वटसावित्री





ज्येष्ठ महिन्यातील आज वटपौर्णिमा. भारतीय संस्कृतीत या दिवसाचे वेगळे महत्त्व आहे. या दिवशी सुहासिनी श्रद्धेने वटसावित्रीचे व्रत पाळतात. या व्रतात सुवासिनी वडाच्या झाडाभोवती प्रदक्षिणा घालून पूजा करतात. ही केवळ पतीच्या दीर्घायुष्यासाठीची धार्मिक परंपरा नसून, भारतीय संस्कृतीने निसर्गाशी जपलेले अतूट नाते जिवंत ठेवणारा संस्कार आहे.

ही परंपरा जुन्या काळापासून गाव खेड्यात श्रद्धेने सुरू आहे. या दिवशी सुवासिनी नटून थटून वडाच्या झाडाभोवती प्रदक्षिणा घालत, दोरा गुंडाळत पूजा करतात आणि पतिराजांना दीर्घायुष्य मागतात. त्याचवेळी नकळत पर्यावरण संवर्धनाचाही संदेश देतात. पौराणिक कथेनुसार सावित्रीने आपल्या बुद्धिमत्ता, निष्ठा आणि दृढ संकल्पाच्या बळावर यमराजांकडून सत्यवानाचे प्राण परत मिळविले. त्याची आठवण म्हणून वडाच्या वृक्षाची पूजा करण्याची परंपरा रूढ झाली. दीर्घायुष्य, स्थैर्य आणि अखंड जीवनचक्राचे प्रतीक असलेला वड आजही पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. प्राणवायू, सावली, जैवविविधतेचे संरक्षण आणि जलसंधारणासाठी वडाचे योगदान अनमोल आहे. या वटवृक्षापासून प्रत्येकाला श्वास देणारा प्राणवायू आपणास मोफत मिळतो. त्याच्या पूजनातून निसर्गाबद्दल कृतज्ञता आपोआप व्यक्त होते. आजच्या पिढीतील अनेक महिलांना या व्रतामागील संस्कार, कुटुंबातील ऐक्य आणि सांस्कृतिक ओळख महत्त्वाची वाटते. तर काही शिक्षित, नोकरी करणार!या युवती या परंपरेकडे श्रद्धेबरोबरच समता, परस्पर सन्मान आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने पाहतात. अलीकडे स्त्री स्वातंत्र्याच्या नावाखाली व्रत वैकल्यापासून दूर असणार!या महिला वडाभोवती सात फेरे मारताना 'सात जन्मी हाच पती मिळू दे' या मागणीकडे पाठ फिरवतात. विचार स्वातंत्र्याचा हा काळ असला तरी वटवृक्ष पूजन ही निसर्गाचा आदर करण्याची भावना होय, ही बाब तेवढीच खरी. 'वडाच्या सावलीत नाते जपले जिवांचे, हिरवाईत दडले भविष्य उद्याचे' म्हणूनच हा सुहासिनीचा उखाणा वटसावित्रीला समर्पक ठरतो.

## मेळघाटच्या २० गावांचा संपर्क तुटला

# बीएसएनएल सेवा ठप्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**




तालुक्यातील अतिदुर्गम रेल्वे धूळघाट परिसरात आठवडाभरापासून बीएसएनएलची मुख्य वायर तुटल्यामुळे मोबाईल नेटवर्क आणि इंटरनेट सेवा पूर्णपणे ठप्प झाली आहे. त्यामुळे रेल्वे धूळघाटसह परिसरातील सुमारे २० गावांतील नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. त्यांचा जगाशी संपर्क तुटला आहे.संपर्क व्यवस्था कोलमडल्या ने शासकीय कार्यालये, विद्यार्थी, व्यापारी तसेच ऑनलाईन व्यवहार करणारे नागरिक अडचणीत आले आहेत. विशेषतः रेल्वे धूळघाट प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व ऑनलाईन कामकाज पूर्णपणे बंद पडले असून आरोग्य सेवेवर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. रुग्णांची ऑनलाईन नोंदणी, विविध आरोग्य योजनांचे पोर्टलवरील अहवाल, औषध साठ्याची माहिती, लसीकरणाची ऑनलाईन नोंद तसेच इतर शासकीय आरोग्य सेवा इंटरनेटअभावी रखडल्या आहेत. मोबाईल नेटवर्क नसल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका, डॉक्टर किंवा संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधणेही कठीण झाले आहे. दुर्गम व आदिवासी भागातील नागरिकांसाठी ही परिस्थिती अधिक गंभीर ठरत असून अनेकांना आवश्यक माहिती व शासकीय सेवा वेळेवर मिळत नाहीत.स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही बीएसएनएल विभागाकडून अद्याप कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याचा आरोप आहे. तुटलेली वायर बदलून नवीन केबल तातडीने टाकावी आणि मोबाईल नेटवर्क व इंटरनेट सेवा पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.रेल्वे धूळघाट परिसरात बीएसएनएल हीच प्रमुख दूरसंचार सेवा असल्याने तिच्यावर हजारो नागरिक अवलंबून आहेत. त्यामुळे संबंधित विभागाने या समस्येची तातडीने दखल घेऊन सेवा पूर्ववत करावी, अन्यथा नागरिकांच्या वतीने वरिष्ठ प्रशासनाकडे लेखी तक्रार करण्याबाबतचा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

## आ. रवी राणा यांच्या अथक पाठपुराव्याला मोठे यश

# अमरावती-बडनेरा परिसरातील ५ रेल्वे उड्डाणपुलांना केंद्र शासनाची मंजुरी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने अमरावतीच्या विकासाला नवी गती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती**

अमरावती शहरातील वाहतूक कोंडी, रेल्वे फाटकांवरील वारंवार होणारी अडचण आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन आमदार रवी राणा यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केलेल्या महत्त्वपूर्ण मागणीला अखेर यश आले आहे. केंद्र शासनाने अमरावती व बडनेरा परिसरातील ५ महत्त्वाच्या रेल्वे उड्डाणपूल (ठजइ) व ठजइ-र्लीी-ऋजइ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या मंजुरीमुळे अमरावती शहराच्या पायाभूत सुविधांच्या विकासात ऐतिहासिक भर पडणार असून नागरिकांना वाहतुकीत मोठा दिलासा मिळणार आहे.या प्रकल्पांना मंजुरी मिळवून देण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष सहकार्य केले असून त्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे आणि आमदार रवी राणा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे केंद्र शासनाकडून या कामांना हिरवा कंदील मिळाला आहे.केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रस्तावांनुसार अमरावती व बडनेरा परिसरात खालील पाच ठिकाणी उड्डाणपूल उभारण्यात येणार आहेत. यामध्ये -पार्वती नगर, अमरावती पार्वती नगर येथील शिवलीला मंगल कार्यालय परिसराला राज्य महामार्ग क्रमांक २०० शी जोडणाऱ्या मार्गावर रेल्वे उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. हा पूल अमरावती-नरखेड रेल्वे



मार्गावरील वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.साई नगर, अमरावती साई नगर ते अकोली रोड या मार्गाला जोडणारा रेल्वे उड्डाणपूल मंजूर करण्यात आला आहे. या पुलामुळे परिसरातील नागरिकांची दैनंदिन वाहतूक अधिक सुलभ होणार आहे. व बडनेरा शहराला अंतर्गत बायपास रोडशी जोडणारा महत्त्वपूर्ण रेल्वे उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. यामुळे वाहनांसोबतच पादचाऱ्यांनाही सुरक्षित मार्ग उपलब्ध होणार आहे.त्याचप्रमाणे बडनेरा रोड - गोपाल नगर मार्ग बडनेरा रोड ते गोपाल नगर जोडणाऱ्या मार्गावर आणखी एक ठजइ-र्लीी-ऋजइ उभारण्यात येणार असून यामुळे परिसरातील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.यामुळे अमरावती आणि बडनेरा परिसरातील अनेक रेल्वे फाटकांवर दिवसातून अनेक वेळा वाहतूक खोळंबते. रेल्वे गाड्यांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. रुग्णवाहिका, शालेय वाहने, शेतकरी आणि व्यावसायिक यांनाही याचा मोठा फटका बसतो. प्रस्तावित उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर रेल्वे फाटकांवरील प्रतीक्षा संपुष्टात येऊन वाहतुकीचा वेग वाढणार आहे. तसेच इंधनाची बचत, वेळेची बचत आणि अपघातांमध्ये घट होण्यास मदत होणार आहे.अमरावती शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहराला आधुनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक होते. याच उद्देशाने आमदार रवी राणा यांनी रेल्वे मंत्रालय, केंद्र शासन तसेच राज्य शासनाच्या विविध स्तरांवर सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मोलाचे सहकार्य लाभल्यामुळे हे प्रकल्प मंजुरीच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचू शकले.या मंजुरीबाबत आनंद व्यक्त करताना आमदार रवि राणा म्हणाले की, अमरावती शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या सोयीसाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत. केंद्र शासनाने मंजुरी दिलेल्या या पाच उड्डाणपुलांमुळे शहराच्या वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल होईल.

# फळपीक विम्यापासून शेतकरी वंचित राहणार

## शासन निर्णय विलंबाने प्रसिद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती-** प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत हवामान आधारित फळपीक विमा योजना २०२६-२७ या १ वर्षाच्या कालावधीकरिता मृग बहार व आंबिया बहारसाठीच्या फळपीकांना लागू करण्याबाबतचा शासन निर्णय २७ जून रोजी काढण्यात आला. तो विलंबाने प्रसिद्ध झाल्याने मृग बहार फळपीक विमाधारक शेतकऱ्यांना पुर्णपणे वंचित ठेवण्यात आले आहे. या प्रकाराने शेतकऱ्यांची घोर निराशा झाली असून ते संतप्त आहेत.यापूर्वी फळपीक विमा योजनेचा शासन निर्णय हा ३ वर्षांचा राहात होता. आणि मृग बहारचा हंगाम सुरू होण्याच्या जवळपास १ महिना अगोदर शासन निर्णय प्रसिद्ध होत असे. परंतु, यावर्षी फक्त १ वर्षाचा शासन निर्णय प्रसिद्ध झाला असून, मृग बहार संत्रा, द्राक्ष (क), पेरू , लिंबू , हळद या पिकाकरिता १४ जून आणि मोसंबी व चिकूकरिता ३० जून ही प्रस्ताव दाखल करण्याची अंतिम मुदत देऊन २७ जूनला उशिरा शासन निर्णय प्रसिद्ध झाला. यामुळे महाराष्ट्रातील हजारो मृग बहार शेतकरी विमा योजनेपासून वंचित राहणार आहे. शासनाने आणि कृषी आयुक्तालयाने याची दखल घेवून शेतकरी हितार्थ मृग बहार फहपीक विमा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत १५ जुलै पर्यंत वाढवून द्यावी, अशी मागणी वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार प्राप्त शेतकरी अरविंद तट्टे यांनी केली आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# कोयलारीच्या भाजीला मागणी

## वनस्पतीच्या कोवळ्या पानांची भाजी करण्याची आदिवासींची परंपरा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मोर्शी :** शहरासह सातपुडा पायथ्याच्या आदिवासी भागात मृग नक्षत्र सुरू होताच कोयलारी या वनस्पतीच्या कोवळ्या पानांची भाजी करण्याची परंपरा पुन्हा एकदा दिसून येत आहे. सध्या कोयलारीच्या झाडांना नवीन पालवी फुटल्याने अनेक आदिवासी महिला शेतावरून येताना किंवा जाताना या झाडाची कोवळी पाने अलगद तोडून घरी नेताना दिसत आहेत.आदिवासी समाजामध्ये विविध वनस्पतींच्या पानांपासून भाजी तयार करण्याची जुनी परंपरा आहे. कोयलारीच्या पानांना स्वच्छ धुऊन कांदा, लसूण, मिरची, टोमॅटो आदी मसाल्यांसह स्वादिष्ट भाजी तयार केली जाते. चवीला रुचकर आणि शरीराला हलकी वाटणारी ही भाजी आदिवासी कुटुंबांमध्ये विशेष आवडीने खाल्ली जाते. शेतात काम करणाऱ्या महिला पारंपरिक पद्धतीने तयार केलेली कोयलारीची भाजी डब्यात आणतात. यावेळी आदीवासी बांधव कोयलारीची भाजी चवीने खाताना दिसतात. स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार कोयलारीच्या झाडाची पाने आपट्याच्या पानांसारखी दिसतात. उन्हाळ्यानंतर शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी ही भाजी उपयुक्त असल्याचा समज आदिवासी समाजात आहे. त्यामुळे मृग नक्षत्रात कोवळी पाने येताच या भाजीला विशेष मागणी वाढते.

याचप्रमाणे पावसाळ्याच्या सुरुवातीला उगवणाऱ्या तरोटा वनस्पतीलाही आदिवासी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. तरोट्याची कोवळी पाने भाजीसाठी वापरली जातात. तसेच या झाडाला येणाऱ्या शेंगांतील बियांचे विविध पदार्थ तयार केले जातात. लोकपरंपरेनुसार वातविकारांवरही या वनस्पतीचा उपयोग होत असल्याचे सांगितले जाते.

### वनस्पतीच्या शास्त्रीय अध्ययनाची गरज

आदिवासी समाजाकडे वनस्पती, औषधी गुणधर्म आणि नैसर्गिक अन्नस्रोतांबाबत मोठा अनुभवसिद्ध ज्ञानसाठा आहे. मात्र हे ज्ञान प्रामुख्याने मौखिक परंपरेतून पुढे जात असल्याने ते जतन करणे आवश्यक आहे. शासन, संशोधन संस्था आणि स्वयंसेवी संघटनांनी दुर्गम भागातील आदिवासी महिला व ज्येष्ठ नागरिकांकडून अशा वनस्पतींची माहिती संकलित करून त्यांचे शाखीय अध्ययन करावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# जिल्हा परिषद मध्ये २८ कोटींच्या कामांची लगबग

## निवडणुकीच्या आचारसंहितेचा अडथळा दूर

### रस्ते, इमारत बांधकाम, तीर्थक्षेत्राच्या १०८ कामांना गती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती :** विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता संपुष्टात येताच जिल्हा परिषदेच्या बांधकामविभागातील सुमारे २८ कोटी रुपयांच्या १०८ विकासकामांच्या प्रक्रियेची लगबग सुरू झाली. आचारसंहितेमुळे रखडलेल्या निविदा प्रक्रिया आणि प्रशासकीय कार्यवाही आता वेगाने सुरू करण्यात आली असून, बांधकाम विभागात यासाठी अधिकारी, कर्मचारी कामाला लागले आहेत.




रस्ते, इमारत बांधकाम, तीर्थक्षेत्र जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातील विकास तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित विविध कामांसाठी निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र, विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागू झालेल्या आचारसंहितेमुळे या महिनाभरापासून ही प्रक्रिया ठप्प होती. थांबवावी लागली होती. त्यामुळे तब्बल कामांच्या निविदा उघडणे ही प्रक्रिया आता निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्याने संबंधित १०८ कामांच्या निविदाउघडण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, लवकरच प्रत्यक्ष कामांना प्रारंभ होणार आहे. पावसाळ्यानंतर अनेक कामांना वेग देण्याचे नियोजन करण्यात आले असून, ग्रामीण भागातील विकासकामांना चालना मिळणार आहे. या कामांमध्ये असल्याने ग्रामीण नागरिकांना मोठा दिलासा आणि इतर पायाभूत सुविधांचा समावेश रस्ते, शासकीय इमारती, तीर्थक्षेत्र विकास मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ७६५ केव्ही उच्चदाब वीजवाहिनीचा टॉवर धोकादायक अवस्थेत; दुर्घटनेची भीती

## टाकरखेडा शंभू येथील प्रकार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९टाकरखेडा शंभू**
आष्टी-परतवाडा मार्गावरील टाकरखेडा शंभू परिसरात शेतकरी दिलीपराव म्हस्के यांच्या शेतातील ७६५ केव्ही उच्चदाब वीजवाहिनीचा टॉवर अर्धवट तुटलेल्या अवस्थेत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली असून शेतकरी आणि परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.टॉवरची अवस्था धोकादायक असल्याने शेतातील कामे करताना शेतकऱ्यांना जीव धोक्यात घालावा लागत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जोरदार वारा किंवा मुसळधार पावसामुळे टॉवर कोसळण्याचा धोका अधिक वाढला आहे. त्यामुळे जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या पार्श्वभूमीवर संबंधित वीज विभागाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून टॉवरची दुरुस्ती अथवा आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी मागणी शेतकरी दिलीपराव म्हस्के यांच्यासह स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# जिल्ह्यात २७ जूनपर्यंत ८२.८ टक्के पाऊस

## नांदगाव खंडेश्वर, अंजनगाव तालुक्यावर मान्सून मेहेरबान चिखलदऱ्यात सर्वात कमी पाऊस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती :** जून महिन्याच्या सुरुवातीला पावसाच्या दडीमुळे चिंतातूर झालेल्या शेतकऱ्यांना मंगळवारपासून सुरू झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातील पावसाची सरासरी सुधारली आहे. २७ जूनपर्यंत जिल्ह्यात सामान्य १३१.१ मिमी पावसाच्या तुलनेत १०१.६ मिमी, म्हणजेच ८२.२ टक्के पाऊस नोंदविण्यात आला आहे. गेल्यावर्षी याच कालावधीत जिल्ह्यात १४८.४ मिमी १११.९ टक्के पाऊस झाला होता.

जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वरतालुक्यात सर्वाधिक १६६.३ मिमी १२३.९ टक्के पावसाची नोंद झाली असून, सामान्य सरासरीपेक्षा अधिक पाऊस झालेला हा जिल्ह्यातील




अव्वल तालुका ठरला आहे. त्यापाठोपाठ अंजनगाव सुर्जी येथे ११४.४ मिमी ११७.६ टक्के, दर्यापूर येथे ९७.२ मिमी, ९९.८ टक्के, धारणी येथे १४२.७ मिमी, ९५ टक्के, मोर्शी व वरूड येथे प्रत्येकी ९४.४ टक्के, तर चांदूर बाजार येथे ९३.८ टक्के पावसाची नोंद झाली आहे. दुसरीकडे चिखलदरा तालुक्यात सर्वात कमी ८३.२ मिमी, ४८ टक्के पाऊस नोंदविलागेला आहे. याशिवाय अचलपूर ५८.८ टक्के, भातकुली ६०.१ टक्के, धामणगाव रेल्वे ६०.८ टक्के आणि तिवसा ६७.१ टक्के तालुक्यांमध्येही अद्याप सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. २७ जून रोजीच्या अहवालानुसार जिल्ह्यात एका दिवसात ७.० मिमी सरासरी पावसाची नोंद झाली. त्यात धारणी १६.६ मिमी, मोर्शी १४.६ मिमी, वरूड १४.३ मिमी आणि तिवसा १३.६ मिमी येथे तुलनेने अधिक पाऊस झाला. पावसामुळे रखडलेल्या खरीप पेरण्यांना आता वेग येण्याची अपेक्षा व्यक्त होत असली, तरी काही तालुक्यांमध्ये अजूनही समाधानकारक पावसाची आवश्यकता कायम आहे.

# जिल्ह्यातील प्रकल्प अद्याप तहानलेलेच !

## केवळ ३९ टक्के जलसाठा, दमदार पावसा अभावी पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची भीती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती**
महिना संपत आला असतानाही समाधानकारक पाऊस न झाल्याने अमरावती जिल्ह्यातील जलप्रकल्पांची स्थिती चिंताजनक झाली आहे.



जिल्ह्यातील एकूण ५६ प्रकल्पांमध्ये सध्या केवळ ३९.४९ टक्के जलसाठा शिल्लक असून, येत्या काळात दमदार पाऊस न झाल्यास पाणीटंचाईची तीव्र झळ नागरिकांना सहन करावी लागू शकते.

जिल्ह्यातील सर्वात मोठे अप्पर वर्धा धरण, सात मध्यम प्रकल्प आणि ४८ लघु प्रकल्पांमध्ये मिळून सुमारे ४१३.५५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध आहे. मात्र हा साठा समाधानकारक नसल्याने शेती, सिंचन तसेच पिण्याच्या पाण्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. जिल्ह्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्याची गरज प्रामुख्याने मान्सूनवर अवलंबून असते.

दरवर्षी जून महिन्यापासून सुरू होणाऱ्या पावसांमुळे प्रकल्प भरून निघतात आणि सिंचनासह पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागतो. मात्र यंदा जून महिनाभर पावसाने दडी मारल्याने प्रकल्पांतील जलसाठ्यात अपेक्षित वाढ झालेली नाही. त्याचा परिणाम खरीप हंगामातील पेरण्यांवरही होताना दिसून येत आहे. जिल्ह्यातील अप्पर वर्धा धरणात सध्या केवळ ४२.०२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. या धरणावर सिंचनाबरोबरच औद्योगिक वापर आणि अमरावती शहराचा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अवलंबून आहे.त्यामुळे आगामी काळात पावसाने साथ दिली नाही, तर पाणीपुरवठ्याबाबत गंभीरपरिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सात मध्यम प्रकल्पांमध्ये सरासरी ३७.७० टक्के, तर ४८ लघु प्रकल्पांमध्ये ३०.७१ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. अनेक लघु प्रकल्पांतील पाणीसाठा अत्यल्प असून काही प्रकल्प कोरडे पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे या प्रकल्पांवर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागातील गावांमध्ये पाणीसंकट अधिक गडद होण्याची चिन्हे आहेत.जलसाठ्यात लक्षणीय वाढ होण्यासाठी प्रकल्प परिसरात दमदार आणि सातत्यपूर्ण पावसाची आवश्यकता असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अन्यथा येत्या काही महिन्यांत जिल्ह्याला पाणीटंचाईच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागू शकते.

### प्रमुख धरणांतील सध्याचा जलसाठा

| प्रकल्प | जलसाठा (टक्के) |
|---|---|
| अप्पर वर्धा | ४२.०२ |
| शहानूर | ३३.४१ |
| चंद्रभागा | ७६.२१ |
| सपन | ६०.८३ |
| पंढरी | ३९.७२ |
| बोर्डी नाला | २०.५१ |
| गर्ग | २.८९ |

# प्रतिबंधित कपाशी बियाण्याचा साठा पकडला

## कृषी विभाग व पोलिसांची सयुक्त कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मोर्शी :** शासन मान्यता नसलेल्या बोगस बियाण्यांची साठवणूक करून ते शेतकऱ्यांना जास्त भावाने विक्री करीत असलेल्या अंबाडा येथील जामा मस्जीद परिसरात कृषी अधिकारी व मोर्शी पोलिसांनी धाड टाकून जवळपास ९० बियाण्यांचे पाकीट जप्त करण्यात येऊन १ लाख ३९ हजार ७५० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

मोर्शी पोलिसस्टेशनच्या हद्दीतील अंबाडा येथे बनावट एचटीबीटीच्या कपाशीचे बियाणे विक्री होत असल्याची गुप्त माहिती मोर्शी पंचायत समितीचे कृषी अधिकारी राहुल चौधरी यांना मिळाली होती. त्या अनुषंगाने त्यांनी उचित कार्यवाही करण्याच्या दृष्टीने मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांना पत्र देऊन पोलिसांची मदत घेतली.मोर्शी तालुका कृषी अधिकारी तथा गुणनियंत्रण निरीक्षक दिनेश चौधरी, सहायक कृषी अधिकारी मनीष काळे, मनोज लंगोटे व मोर्शी पोलिस ठाण्यातीलअंबाडा बीटचे पो. कॉ. मंगेश बदुकले यांनी जामा मस्जीद परिसरात राहणाऱ्या मोहम्मद अफजल जाफर खान अहमदखान यांच्या घराची




झडती घेतली असता त्यांच्या घरातून सोमनाथ महादेव कंपनीचे २३ पाकीट, व्हाईट गोल्ड जम्बोचे २० पाकीट, तिलाक फाईव्ह जी १८ पाकीट, सोमनाथ ६५९ फाइवजी २५ पाकीट असे एकूण ८६ पाकीट आढळून आले. सदरचे ८६ बनावट बियाण्यांचे पाकीट जप्त करण्यात आले. याप्रकरणी तालुका कृषी अधिकारी फिर्यादी दिनेश चौधरी यांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीच्या ताब्यातून १ लाख २९ हजार ७५० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत आरोपीला विचारपूस केली असता बियाणे साठवणूक करण्याचा कुठलाही परवाना नसून एचटीबीटी बियाण्याचे पाकीट आजूबाजूच्या शेतकऱ्यांना विक्रीकरिता आणल्याचे सांगितले. पुढील तपास ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्शी पोलिस करीत आहे.-

# कोट्यवधींची इमारत पडून, पशुपालकांची मात्र गैरसोय

## उद्घाटनाच्या प्रतीक्षेत अंजनगावबारीचा नवा पशुवैद्यकीय दवाखाना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अंजनगाव बारी**
शासनाच्या निधीतून लाखो रुपयांचा खर्च करून अंजनगाव बारी येथे अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज नवीन शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याची इमारत उभारण्यात आली आहे. इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन तब्बल पाच महिने उलटले तरी उद्घाटनाचा मुहूर्त न मिळाल्याने ही इमारत अद्याप वापराविना पडून आहे. परिणामी पशुपालकांना जुन्याच जीर्ण व अपुऱ्या जागेच्या इमारतीत जनावरांवर उपचार करून घ्यावे लागत असून मोठी गैरसोय सहन करावी लागत आहे.

नवीन इमारतीमध्ये प्रशस्त उपचार कक्ष, कार्यालयीन व्यवस्था, संरक्षक भिंत, प्रवेशद्वार व इतर आवश्यक सुविधा उपलब्धअसूनही प्रशासकीय दिरंगाईमुळे त्याचा लाभ पशुपालकांना मिळत नाही. दुसरीकडे जुना दवाखाना जीर्ण अवस्थेत असल्याने उपचारासाठी येणाऱ्या शेतकरी व पशुपालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.सध्या



दवाखान्यात महिला पशुवैद्यकीय अधिकारी श्रेणी-१ कार्यरत असून, इतर अनेक आवश्यक पदे रिक्त असल्याने कामाचा अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. पशुधन सहायक, प्रयोगशाळा परिचर, आरोग्य सेवक, शिपाई/परिचर तसेच इतर सहाय्यक कर्मचाऱ्यांची पदे तातडीने भरण्याची गरज व्यक्त होत आहे. पुरेशा मनुष्यबळाअभावी ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय सेवा प्रभावीपणे देताना अडचणी निर्माण होत आहेत.अंजनगाव बारी व परिसरातील शेतकरी आणि पशुपालकांनी नवीन दवाखान्याचे तातडीने उद्घाटन करून सेवा सुरू करावी, तसेच रिक्तपदे भरून दर्जेदार पशुवैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### पशुवैद्यकीय चिकित्सालयाला अतिरिक्त कर्मचाऱ्यांची गरज

अंजनगाव बारी परिसरातील १० गावांसाठी हे एकमेव शासकीय पशुवैद्यकीय चिकित्सालय आहे. सध्या महिला पशुवैद्यकीय अधिकारी श्रेणी-१ यांच्यावरच संपूर्ण कामकाजाची जबाबदारी असून त्यांना बडनेरा व अंजनगाव बारी या दोन्ही ठिकाणांचा कारभार सांभाळावा लागतो, तसेच पशुधन सहाय्यक, प्रयोगशाळा परिचर, आरोग्यसेवक, शिपाई व इतर सहायक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने अतिरिक्त कर्मचाऱ्यांची तातडीने नियुक्ती करण्याची मागणी जोर धरत आहे.

# नियमाकुल घरकुल जागेवर मेंढपाळांचे अतिक्रमण !

## लाभार्थी घरकुलाच्या प्रतीक्षेत, प्रशासनाचे दुर्लक्ष कोंडेश्वर रोडवर गिट्टी, रेती व डस्टचे ढीग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अंजनगाव बारी**
अंजनगाव बारी येथील नियमाकुल घरकुल योजनेसाठी राखीव जागेवर सध्या मोठ्या प्रमाणात मेंढपाळांनी कळपांसह तात्पुरता तळ ठोकल्याने अतिक्रमणाची समस्या गंभीर बनली आहे. शेकड़ों मेंढ्या या जागेवर चराईसाठी व वास्तव्यास असल्याने घरकुलासाठी पात्र लाभार्थ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



घरकुल योजनेचे लाभार्थी अनेक महिन्यांपासून स्वतः व्या घराच्या प्रतीक्षेत आहेतः मात्र या जागेवर पिण्याच्या पाण्यासाठी केवळ कूपनलिका (हापशी) उपलब्ध असून रस्ते, वीज, गटारे, जलनिस्सारण आदी मूलभूत सुविधा अद्यापही उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. त्यातच अतिक्रमणामुळे घरकुल उभारणीस अडथळे निर्माण होण्याची भीती व्यक्त भविष्यात केली जात आहे.दरम्यान, अंजनगाव बारी-कोंडेश्वर रोडवर सुरु असलेल्या रस्ते बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात गिट्टी, रेती व डस्टचे ढीग रस्त्यालगत टाकण्यात आले आहेत त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून परिसराचे सौंदर्यही बिघडत आहे. या साहित्याचा वापर अत्यंत संथ गतीने होत असल्याने ते अनेक दिवसापासून रस्त्यालगत पडून आहे.स्थानिक ग्रामपंचायत व संबंधित प्रशासनाने या दोन्ही गंभीर प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. नियमाकुल घरकुल जागेवरील अतिक्रमण तातडीने हटवून मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच रस्त्यालगत पडून असलेले बांधकाम साहित्य हटवून वाहतुकीचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# उद्या वाजणार शाळांची घंटा; प्रवेशोत्सवाची जय्यत तयारी सुरू

## पाठ्यपुस्तके मिळतील, गणवेश अधांतरी

**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि२९अमरावती**

नव्या शैक्षणिक वर्षाला उद्या मंगळवार (ता. ३०) पासून सुरवात होणार आहे. दरम्यान, शिक्षण विभागाने प्रवेशोत्सवाची तयारी करण्याचे निर्देश मुख्याध्यापक, शिक्षकांना दिले होते. त्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले आहे. असे असले तरी शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती पाठ्यपुस्तके पडतील, परंतु गणवेश सध्यातरी अधांतरीच म्हणावा लागेल. लोकप्रतिनिधी, अधिकार्‍यांच्या शाळा भेटीने विद्यार्थ्यांच्या प्रवेशोत्सवाला आनंदाची किनार राहणार आहे.

उन्हाळी सुट्ट्या आता संपल्या आहेत. तब्बल अडीच महिन्याची मरगळ झटकून विद्यार्थी मंगळवारी शाळेत येतील. जिल्हा परिषद, नगर पालिका तसेच खासगी, अशा मिळून तीन हजार २०० हून अधिक शाळांची घंटा वाजणार आहे. अतिशय दमदार पद्धतीने नव्या शैक्षणिक वर्षाची सुरवात केल्या जाणार आहे. पहिल्या वर्गातील विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा केला जाणार आहे. त्या अनुषंगाने प्राथमिक शिक्षण विभागाने सोळाही पंचायत समितीच्या गटशिणाधिकार्‍यांच्या माध्यमातून मुख्याध्यापक, शिक्षकांना आवश्यक सूचना दिल्या आहेत.

शाळापूर्व तयारीला वेग आला असून, वर्गातील साफसफाईसुद्धा आटोपण्याच्या मार्गावर आहे.

एकंदरीत शाळेच्या पहिल्या दिवशी बहुतांश विद्यार्थी रंगीबेरंगी गणवेशातच येण्याची शक्यता आहे. एकंदरीत शाळेचा पहिला दिवस उत्साहात साजरा करण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभाग सज्ज झाला आहे.

### लोकप्रतिनिधी, अधिकाऱ्यांच्या शाळा भेटी

विद्यार्थ्यांचा शाळेचा पहिला दिवस आनंदी वातावरणात जावा, याकरिता लोकप्रतिनिधी तसेच अधिकार्‍यांनी शाळा भेटी द्याव्या, असे निर्देश देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने शिक्षण विभागाने नियोजन केले आहेत. यात प्रामुख्याने आमदार .खासदार,मंत्री ,महापौर शाळांना भेटी देणार असून अधिकारी , इतर लोकप्रतिनिधी तसेच इतर अधिकारी असे मिळून शाळांना प्रत्यक्ष भेटी देण्यात येणार आहे. या भेटीचे संपूर्ण नियोजन प्राथमिक शिक्षण विभागाने केले आहे.



### बूट, पायमोजेसाठी ऑगस्ट उजाडणार

समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद, नगर पालिका शाळेतील विद्यार्थ्यांना एक बूट आणि दोन पायमोज्याच्या जोड्या देण्यात येते. यंदा जवळपास पावणेदाने लाख विद्यार्थ्यांना देण्याचे नियोजन आहे. याकरिता प्रती विद्यार्थी १७० रुपये देण्यात येणार आहे. परंतु, गणवेशाचा अपुरा निधी यंदा मिळाल्याने बूट, पायमोजेचा निधी कधी मिळणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे. यंदा बूट आणि पायमोजेकरिता ऑगस्ट महिनाच उजाडणार असल्याचे दिसून येत आहे.पंचायत समितीस्तरावरून शाळांपर्यंत पाठ्यपुस्तकांची वाहतूक झाली आहे. त्यामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांची हाती पाठ्यपुस्तके पडणार आहेत. परंतु, गणवेश सध्यातरी अधांतरीच म्हणावा लागेल. प्रती विद्यार्थी दोन गणवेश आहेत.

# जिल्ह्यातील अनेक हॉटेलातून पनीर, चीज अन् खवाही गायब!

## शहरासह ग्रामीण भागात 'एफडीए'च्या धसक्याने मेनूत केली कपात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती –** आपण काय खातोय, याचा विचार आता सामान्य लोकही करू लागले आहेत. हा विचार करायला अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी भाग पाडले आहे. दुग्धजन्य पदार्थ उत्पादकांनी तर त्यांची धास्तीच घेतली आहे. त्यामुळे स्वस्त दरातील पनीर, खवा, क्रिम उत्पादकांनी अनिश्चित काळासाठी 'दुकान बंद' केले आहे. ग्राहकांची फसवणूक करणार्‍या हॉटेल, ढाबेवाल्यांच्या मेनू कार्डमधून हे पदार्थच गायब झाले आहेत.





दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये लोणी, तूप, पनीर, खवा याशिवाय खाद्यतेल, मसाले, मध, डाळी आणि केशर यामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत असते. उदाहरणादाखल चीजमधील भेसळीतून होणारे अर्थकारण समजून घ्यायचे झाल्यास, ॲनालॉग चीजची किंमत ही पारंपरिक, शुद्ध चीजच्या तुलनेत तीस ते साठ टक्के कमी असते. मात्र, हे पदार्थ गंभीर आजारांना निमंत्रण देऊ शकतात. आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पंचवीस मे रोजी 'एफडीए'चा पदभार स्वीकारला. त्यानंतर भेसळखोर, गुटखा माफिया आणि बनावट औषधांच्या विक्रेत्यांविरोधात धडक कारवाई सुरू केली आहे. त्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे अन्नात विष कालवणार्‍यांचे धाबे दणाणले. त्याचा थेट परिणाम म्हणून बाजारात अशा पदार्थांचा तुटवडा आहे किंवा उत्पादन बंद आहे, अशी माहिती समोर येत आहे.'एफडीए'च्या कारवाईच्या भीतीने अनेकांनी तर व्यवसाय बंद ठेवले आहेत. हॉटेल चालकांनी तर चीज, पनीर आणि खवा यांसारख्या पदार्थांना बॅनच केल्याचे पहावयास मिळत आहे. अन्न व औषध प्रशासन विभाग स्वातंत्र्यापासून कार्यरत आहे. अपवाद वगळता अनेक अधिकारी तोडपाण्यासाठीच छापा टाकतात, असा या खात्याचा नाव लौकिक आहे. काही अधिकारी दक्ष असून त्यांनी यापूर्वीही भेसळयुक्त अन्नाचे घातक परिणाम पचनसंस्थेपासून सुरू होतात. कारण पचनसंस्था ही दूषित पदार्थांपासून शरीराचे संरक्षण करीत असते. भेसळयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने यकृत आणि पचनसंस्थेवर दूरगामी व विपरीत परिणाम होऊ शकतात. नागरिकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. तुकाराम मुंढे यांनी आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर 'नाम ही काफी है...' चा अनुभव येऊ लागला.

# लोकार्पणाच्या राजकारणात बडनेरेकर वेठीस!

# तयार उड्डाणपूल बंद, अरुंद रस्त्यावर अपघातांची मालिका

## काम पूर्ण होऊनही उद्घाटनाचा मुहूर्त नाही; वाहतूक कोंडी, रुग्णवाहिका अडकल्या, नागरिकांचा संताप शिगेला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बडनेरा** बडनेरा येथील रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण होऊनही त्याचे लोकार्पण केवळ प्रशासकीय दिरंगाई आणि राजकीय औपचारिकतांमुळे रखडल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पूल पूर्णपणे तयार असूनही तो सर्वसामान्यांसाठी बंद ठेवण्यात आल्याने हजारो नागरिकांना रोज वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे नेत्यांच्या तारखेसाठी जनतेला वेठीस का धरले जात आहे? असा संतप्त सवाल बडनेरेकरांकडून उपस्थित केला जात आहे.दस्तुरनगर, एमआयडीसी, कोंडेश्वर मंदिर तसेच बडनेरा शहराला जोडणारा हा महत्त्वाचा उड्डाणपूल वाहतुकीसाठी अत्यंत आवश्यक मानला जातो. मात्र पूल सुरू नसल्यामुळे नागरिकांना रेल्वे गेटखालूनच प्रवास करावा लागत आहे.



रेल्वे गेट वारंवार बंद होत असल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून, सकाळ-संध्याकाळ वाहतूक पूर्णपणे विस्कळीत होत आहे.यामुळे राष्ट्रीय महामार्गालगतच्या अरुंद पर्यायी रस्त्यावरून अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ वाढली आहे. या रस्त्यावर दररोज किरकोळ तसेच गंभीर अपघात घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वारांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका बडनेरा रेल्वे स्थानकावर जाणाऱ्या प्रवाशांना बसत आहे. ट्रॅफिकमध्ये अडकून अनेक प्रवाशांच्या गाड्या चुकत असून, रुग्णवाहिकाही वेळेत रुग्णालयात पोहोचू शकत नसल्याने गंभीर रुग्णांच्या जीवितालाही धोका निर्माण होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, पूल पूर्ण झाल्यानंतरही केवळ उद्घाटनासाठी एखाद्या नेत्याची तारीख निश्चित होत नसल्यामुळे जनतेला नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

जर पूल वाहतुकीसाठी पूर्णपणे सुरक्षित असेल, तर उद्घाटनाच्या औपचारिकतेची वाट न पाहता तो तातडीने खुला करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

येत्या काही दिवसांत उड्डाणपूल वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला नाही, तर तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशारा बडनेरा परिसरातील नागरिकांनी दिला आहे. आता प्रशासन आणि संबंधित लोकप्रतिनिधी जनतेचा संताप लक्षात घेऊन तातडीने निर्णय घेतात की, उद्घाटनाच्या राजकारणात नागरिकांची आणखी फरफट होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शाळा व्हॅन-बस प्रवास महाग; भाड्यात १५ ते २० टक्के वाढ

## इंधन दरवाढीचा पालकांना फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती –** नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात ३० जून पासून होणार असून पाठ्यपुस्तकांसोबतच इंधन दरवाढीचा परिणाम पालकांच्या खिशावर होणार आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमती, वाहनांच्या देखभालीचा वाढलेला खर्च आणि विविध शासकीय नियमांचे पालन करण्यासाठी होणारा अतिरिक्त खर्च यामुळे अमरावती शहर व ग्रामीण भागातील स्कूल व्हॅन आणि बस चालक भाड्यात १५ ते २० टक्क्यांपर्यंत वाढ झाली असल्याने पालकांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

अमरावती शहर आणि परिसरात सुमारे ६०० हून अधिक स्कूल व्हॅन व बस दररोज हजारो विद्यार्थ्यांची शाळेत ने-आण करतात. काही वाहने खासगी शाळांच्या मालकीची आहेत, तर बहुतांश वाहने खासगी चालकांकडून चालविली जातात. शाळा सुरू होण्यापूर्वीच पेट्रोल डिझेल मध्ये दरवाढ झाल्यानंतर वाहतूक भाडेवाढीची चर्चा सुरू झाल्याने अनेक पालक आर्थिक ताणाखाली आले आहेत.वाहतूक व्यावसायिकांचे म्हणणे आहे की, केवळ इंधनच महाग झालेले नाही, तर वाहनांचे पासिंग, विमा, फिटनेस, देखभाल, दुरुस्ती आणि चालकांचे वेतन यासह सर्व खर्चात मोठी वाढ झाली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे,



जीपीएस, फायर एक्स्टिंग्विशर आणि इतर सुरक्षा सुविधा अनिवार्य असल्याने त्यासाठीही अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. शालेय विद्यार्थी वाहतूक संघाचे अध्यक्ष बंडू कंपिलकर यांनी सांगितले की, दरवर्षी वाढणाऱ्या खर्चामुळे जुन्या दरात सेवा देणे शक्य होत नाही. त्यामुळे काही प्रमाणात भाडेवाढ अपरिहार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**पालकांसोबत चालकांवरही वाढला नियमांचा ताण**

अंबानगरी शालेय वाहतूक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र गुल्हाने यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने घालून दिलेल्या सर्व नियमांचे पालन करावे लागते. या सर्व खर्चासोबतच यावर्षी इंधन दरवाढीमुळे आर्थिक ताण अधिक वाढला आहे. त्यामुळे भाडेवाढीशिवाय पर्याय नाही.

वाहतूक संघटनांच्या अंदाजानुसार, कठोरा ते इर्विन चौक या मार्गावरील सध्या सुमारे १,५०० रुपये असलेले मासिक भाडे १,८०० रुपयांपर्यंत जाऊ शकते. तसेच बडनेरा ते इर्विन चौक मार्गावरील १,२०० रुपयांचे भाडे १,५०० रुपयांपर्यंत भाडे द्यावे लागणार आहे.

### २०० ते ३०० रूपये भाडेवाढ

शासन स्तरावर इंधनाचा वापर कमी करण्यासाठी आंठवड्यात काही दिवस ऑनलाइन आणि काही दिवस ऑफलाइन शिक्षण सुरू ठेवण्याबाबत चर्चा सुरू होती. मात्र, तसे धोरण लागू होणे शक्य नाही. स्कूलबस च्या भाडेवाढ संदर्भात वरिष्ठ स्तरावर बैठका सुरू आहेत, मात्र अद्याप पर्यंत दर निश्चित झाला नाही. ३० जून तारखेपासून शाळा सुरू होणार आहेत. त्यामुळे पंधरा ते वीस टक्के भाडेवाढ ही निश्चित आहे. दरम्यान वरिष्ठ स्तरावर काही निर्णय झाल्यास त्यामध्ये बदलही करता येईल. असे भगवे वादळ विद्यार्थी वाहतूक महासंघाचे अध्यक्ष अतुल खोड यांनी सांगितले.

# गाडीला HSRP नंबर प्लेट नसेल तर १ जुलैपासून भरावा लागेल दंड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–** वाहनचालकांसाठी मोठी बातमी समोर आली आहे. १ जुलैपूर्वी तुम्ही एक काम केलं नाहीत तर तुम्हाला कारवाईला सामोर जावं लागू शकतं. कारण राज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांसाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (कडठझ) बसविणे आता बंधनकारक करण्यात आले असून, त्यासाठी ३० जून २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. या मुदतीनंतरही कडठझ नंबर प्लेट न बसविणाऱ्या वाहनधारकांवर १ जुलैपासून मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन विभागाने दिली आहे.




परिवहन विभागाच्या माहितीनुसार, कडठझ नंबर प्लेट बसवल्यास वाहन चोरी, बनावट नंबर प्लेटचा वापर तसेच गुन्हेगारी कृत्यांमध्ये वाहनांचा गैरवापर रोखण्यासाठी याचा मोठा फायदा होणार आहे. कडठझ नंबर प्लेट न बसविणाऱ्या वाहनधारकांना केवळ दंडालाच सामोरे जावे लागणार नाही, तर आरटीओमधील आरसी ट्रान्सफर , पत्ता अपडेट करणे , हायपोथेशीयन टर्मिनेशन , री – रजिस्ट्रेशन , यांसारखी कामे कडठझ शिवाय करता येणार नाहीत. राज्यात कडठझ बसविण्याच्या प्रक्रियेसाठी तीन स्वतंत्र झोन तयार करण्यात आले आहेत. झोन १ साठी रोझमेर्टा टेक्नॉलॉजीज लिमिटेड, झोन २ साठी रिअल इंडस्ट्रीज लिमिटेड आणि झोन ३ साठी एफटीए कडठझ सोल्यूशन्स प्रा. लि. या कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# यंदा वह्यांच्या किमतीमध्ये १० टक्क्यांनी वाढ

## शाळांमधून पुस्तके मिळत असल्याने नवीन पुस्तकांचा व्यवसाय ठप्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती–** अमरावती जिल्हाभरातील शाळांची घंटा येत्या ३० जून रोजी वाजणार असून, नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी विद्यार्थी आणि पालकांची जय्यत तयारी सुरू झाली आहे. दप्तर, वह्या, पुस्तके, कंम्पास पेटी, बूट, रेनकोट आणि छत्री यांसारख्या शालेय साहित्याने बाजारपेठ पूर्णपणे फुलली आहे. शाळा सुरू होण्यास अवघे दोन दिवस शिल्लक असल्याने अमरावती शहरातील मोची गल्ली, गांधी चौक, राजकमल, जयस्तंभ, चित्रा, इतवारा, श्याम चौक आणि अन्य बाजार परिसरात खरेदीसाठी पालकांची प्रचंड गर्दी दिसून येत आहे.आपल्या लाडक्या मित्रांना पुन्हा भेटण्याच्या आणि नवीन साहित्यासह शाळेत जाण्याच्या उत्सुकतेपोटी मुलांमध्ये कमालीचा उत्साह आहे. यावर्षी पालकांच्या खिशाला कात्री लागणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धजन्य परिस्थितीमुळे कागदाचा मोठा तुटवडा



निर्माण झाला असून छपाईचा खर्च वाढल्याने पाठ्यपुस्तके व वह्यांच्या किमतीत १० ते १५ टक्के दरवाढ झाली, असे शहरातील प्रमुख पुस्तक विक्रेत्यांनीसांगितले. पूर्वी ५०० ते ५२० रुपये डझनाने मिळणाऱ्या वह्या आता थेट ६०० रुपयांवर गेल्या आहेत. मात्र, शाळांच्या बॅग व दप्तरांच्या किमती गतवर्षी इतक्याच स्थिर आहेत. केजीपासून ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी २५० रुपयांपासून ते ७०० रुपयांपर्यंतची दप्तरे आमच्याकडे उपलब्ध आहेत. शाळा सुरू होण्यास दोन दिवस उरले असल्याने खरेदीसाठी गर्दी होत आहे. असे विक्रेते गजानन देशमुख यांनी सांगितले.

# शिरजगाव पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड

## १.१६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९शिरजगाव कसबा** अमरावती ग्रामीण पोलिसांनी अवैध धंद्यांविरोधात सुरू केलेल्या मोहिमेत शिरजगाव कसबा पोलिसांनी मोठी कारवाई करत जुगार अड्ड्यावर धाड टाकली. या कारवाईत १ लाख १६ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तीन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार शनिवारी रात्री शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याचे पथक गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार शेतातील खुल्या जागेत काही जण 'एक्का बादशाह' नावाचा पैशांचा जुगार खेळत असल्याचे समोर आले. पोलिसांनी पंचांसमक्ष छापा टाकताच काही जणांनी पळ काढला. घटनास्थळी तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले, तर सहा जण फरार झाले.कारवाईदरम्यान ५२ पत्त्यांचा संच, रोख रक्कम, आरोपींकडील रोकड, दोन मोबाईल फोन आणि तीन दुचाकी असा एकूण १,१६,०८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार अधिनियमाच्या कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अमन सिरसट, पोउपनि प्रशांत जाधव आणि त्यांच्या पथकाने केली.

